# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**सायंकाळ**

**(पोलीस वार्तापत्र)**

---

**दिनांक १२.०४.२०२६ रविवार**

**पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर, परिमंडळ क्र. ०५ अंतर्गत एकुण ११८ गुन्हेगार दोन दिवसाचे कालावधीकरीता हद्दपार :—**

श्री निकेतन कदम, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०५ यांनी डॉ. आंबेडकर जयंती सणाचे/उत्सवाचे संबंधाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी या करीता त्यांना प्राप्त विशेष कार्यकारी दंडाधिकारी पदाच्या अधिकारांन्वये कलम १६३(२) भा.ना.सु.सं. अन्वय त्यांचे परिमंडळ क्र. ५ अंतर्गत येणारे पोलीस ठाणे यशोधरानगर, कळमणा, पारडी, वाठोडा व पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतील शरीराविरूध्द, मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे तसेच अवैध दारू विक्री करणारे गुन्हेगारांकडुन सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची दाट शक्यता असल्याने **दिनांक १३.०४.२०२६ ते १४.०४.२०२६ पर्यंत दोन दिवसाचे कालावधीकरीता** एकुण ११८ गुन्हेगारांना दिनांक १२.०४.२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशान्व्ये पोलीस ठाणेचे हद्दीत राहण्यास परावृत्त केले आहे. हद्यपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांमध्ये पोलीस ठाणे यशोधरानगर येथील—४१, कळमना—१९, पारडी—२०, वाठोडा—२०, भांडेवाडी येथील—१८ गुन्हेगारांचा समावेश असून त्यांना वर नमुद कालावधीचे दरम्यान पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात प्रवेश न करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे तहसील:— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १२.०४.२०२६ चे १२.३० ते १३.०० वा. चे दरम्यान, तहसील पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, डागा हॉस्पिटलचे मागे, ज्योती नगर, खदान येथे एक इसम हातात तलवार घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, एक ईसम जोरजोरात आरडाओरडा करुन हातात तलवार घेऊन धुमधाम करतांना दिसून आला. त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी तलवार काढुन घेतली. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विशाल दिलीप कुंभरे वय ३३ वर्षे रा. ज्योतीनगर खदान, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी तलवार किंमती ५००/— रू. ची जप्त करण्यात आली.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ११.०४.२०२६ चे १८.०० वा. ते दिनांक १२.०४.२०२६ चे ०७.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट नं. २०३, लोककल्याण सोसायटी, केशव किराणा स्टोअर्स जवळ, नागपुर

येथे राहणा फिर्यादी सौ. भुमिता गणेश धोटे वय ४५ वर्षे हया आपले राहते घराला कुलुप लावुन शेती कामाकरीता काटोल येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी–कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीचे कुलूप तोडून त्यातील रोख ७०,०००/–रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,७०,०००/–रू. मुद्येमाल चोरुन नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. स्वप्निल राऊत ९७६४८२२९०९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे कळमणा. :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०७.०४.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, फिर्यादी सौ. अमरिका दिव्यनारायण मंडले वय ६० वर्ष रा. दिवाणटोला, जि. राजनांदगाव, छत्तीसगड, ह.मु. चिखली वस्ती झोपडपट्टी, कळमणा, नागपूर हया त्यांची मुलगी सौ. द्वारका विक्की गायकवाड वय ३७ वर्ष रा. चिखली झोपडपट्टी, कळमणा, नागपूर यांचेसोबत पायदळ किराणा दुकानात जात असता आरटीओ ऑफीस जवळील चिखली पुलासमोरील रस्ता क्रॉस करीत असता, विटाभट्टी चौकाकडून येणा–या दुचाकी गाडी क्र. एमएच ४९ सीपी ७३७८ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादी व त्यांचे मुलीला धडक दिल्याने दोघीही खाली पडून गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. फिर्यादी यांचेवर उपचार करण्यात आला व फिर्यादीचे मुलीस पुढील उपचारकामी गायकवाड हॉस्पिटल व तेथून मेडीकल हॉस्पिटल, अजनी येथे दाखल केले होते. दिनांक ०९.०४.२६ चे १९.४५ वा. फिर्यादीचे मुलीला डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी पोलीस ठाणे कळमणा येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

अकस्मात मृत्यूची चौकशी तसेच फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि प्रमोद ढोबळे ७७२१०७९७४९ यांनी दुचाकी वाहन चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१,१२५(ब) भा. न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे धंतोली :–** दिनांक ०५.०४.२०२६ चे ०१.०० वा. चे सुमारास, ईसम नामे निखिल अशोक गोंदुरे वय २७ वर्षे, रा. अग्रसेन चौक, शाहू हॉस्पिटल मागे, तहसील नागपुर हे त्यांचे मोटार सायकलने घरी जात असता, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत धंतोली गार्डन समोर रोडचे बांधकाम सुरु असल्याने तेथे बनविलेल्या ब्रेकरवरुन त्यांची गाडी उसळल्याने ते गाडीसह खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता न्युरॉन हॉस्पिटल व तेथून मेडीकल हॉस्पीटल, ट्रॉमा सेंटर, येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक १२.०४.२०२६ चे ०९.४५ वा. सुमारास वार्ड चे डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे धंतोली येथे पोउपनि कृष्णा वाघ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपूर शहर.**